आजचा सुविचार

तारुण्याचा जोम अंगी आहे
तोवरच कोणतीही गोष्ट शक्य होईल
कार्याला लागण्याची अत्यंत उचित
अशी हीच वेळ आहे...
– स्वामी विवेकानंद

दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

आतील पानात
- न्यायालयाचे प्रश्न धारदार; अधिकाऱ्यांना गोत्यात आणणार...
- अमेरिकेतील गन संस्कृती...
- शिवसंघर्षाची साक्ष देणारं चौथीतील इतिहासाचं पुस्तक

वर्ष : ०५ | अंक : ३५, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.१९ सप्टेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## मुखेडमध्ये ब्रेक फेल होऊन ट्रकचा थरार
### अनेक वाहनांना उडवले २४ जखमी, तिघांची प्रकृती गंभीर



**अक्षराज : अशोक लोणीकर**

**दि.१८, मुखेड (नांदेड) :** मुखेड शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग १६१-अ वर अण्णाभाऊ साठे बा-हाळी चौकात बुधवारी दि.१७ दुपारी ३ च्या सुमारास एका मालवाहतूक ट्रकचे ब्रेक फेल झाल्याने अनेक वाहनांना उडवले.या भीषण अपघातात तब्बल २४ नागरिक जखमी झाले असून, त्यापैकी तिघांची प्रकृती गंभीर आहे. हा अपघात अचानक आणि अनपेक्षितपणे एवढा मोठा झाल्याने मुखेड शहर हादरले आहे.शहरातील अण्णाभाऊ साठे बा-हाळी चौकात प्रचंड वर्दळ असते. नागरिकांनी मोटर सायकली असो किंवा दुकाने राष्ट्रीय महामार्गावर थाटून रस्ता वहानासाठी लहान करून आपला व्यवसाय थाटत आहेत, त्यामुळे लहान मोठे अपघात होत आसतात वारंवार पत्रकार बांधवाना या राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमण हाटवा व रस्ता मोकळा करा असे संबंधीत कार्यालयाशी संपर्क साधून पत्रकार बांधवानी आवाज उठविला तरी त्याचा काहींच उपयोग झाला नाही व आज वर्दळी ठीकानी देगलूरकडे भरधाव वेगाने जाणाऱ्या मालवाहतूक ट्रकचा (क्रमांक एमएच ०६ ऐक्यू ६२४९) ताबा सुटला. अनियंत्रित झालेल्या या ट्रकने चौकात उभ्या असलेल्या एका काळ्या-पिवळ्या टॅक्सीला, पाणीपुरी गाड्याला, पानपट्टी व फळांच्या गाड्यांना, एका दुचाकीला आणि एका ऑटो रिक्षाला धडक दिली. अनेक वाहनांचा चक्काचूर करत ट्रक पुढे दुभाजकावर आदळून ट्रक थांबला. यात तिघांची प्रकृती गंभीर आहे. या अपघाताची माहिती मि ळताच स्थानिक नागरिकांनी तातडीने मदतकार्य सुरू केले आणि जखमींना जवळच्या उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. या अपघातात एकूण २४ नागरिक जखमी झाले आहेत. उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. संतोषकुमार टाकसाळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, जखमींपैकी अशोक गायकवाड, प्रविण इंगोले, बालाजी माकीनवाड यांची प्रकृती गंभीर असल्यामुळे त्यांना पुढील उपचारासाठी नांदेड येथे हलविण्यात आले आहे. या अपघातात एकूण २४ नागरिक जखमी झाले आहेत. हा रस्ता मोकळा राहीला असता तर आजचा एवढा मोठा अपघात झाला नसता हा राष्ट्रीय महामार्ग शहरातून जात असल्यामुळे वर्दळ जास्त असते रस्त्यांवरील अतिक्रमण याकडे प्रशासनाने या गंभीर बाबींकडे लक्ष दिल्यास भविष्यात अशा घटना होऊ शकत नाही अशी मागणी नागरिकांनी प्रत्यक्ष दर्शनी केली आहे.

## बीडकरांच्या स्वप्नातील रेल्वे आज पटरीवर धावली
### मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी रेल्वेला दाखवला हिरवा झेंडा






**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.१८, बीड :** गेल्या अनेक वर्षापासून बीडकरांनी पाहिलेले रेल्वेचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी स्व.गोपीनाथरावजी मुंडे, स्व. केशरकाकू क्षीरसागर यांच्यासह आजपर्यंत अनेक राजकीय नेत्यांनी अतोनात परिश्रम घेऊन अखेर बीड जिल्हा वासियांचे स्वप्न पूर्ण केले. आज अहिल्यानगर ते बीड रेल्वेच्या उद्घाटनाप्रसंगी व्यासपीठावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री पंकजा मुंडे, खा. बजरंग सोनवणे, खा. रंजनीताई पाटील, आ. धनंजय मुंडे, आ. नमिता मुंदडा, आ. विजयसिंह पंडित, आ. काळे माजी आ. भीमराव धोंडे यांच्यासह इतर मान्यवरांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम सोहळा पार पडला. यावेळी व्यासपीठावर बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी गोपीनाथराव मुंडे यांच्या रेल्वे हा आवडीचा विषय होता असे म्हटले. तसेच आजचा दिवस हा दोन अर्थाने महत्त्वाचा आहे कारण १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती दिवस व देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा पण जन्मदिवस आहे असे म्हटले. तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाषणात सांगितले की धार्मिक आणि ऐतिहासिक समृद्ध वारसा लाभलेली संतांची भूमी विकासाकडे वाटचाल करत आहे असे म्हटले. यावेळी भाषणात मंत्री पंकजा मुंडे यांनी मुंडे साहेबांनी रेल्वे आणण्यासाठी किती प्रयत्न केले याचा उल्लेख केला. तसेच खासदार रंजनीताई पाटील यांनी भाषणात बोलताना हि रेल्वे जलद गतीने मुंबईला पोहोचवा असे म्हटले. खा. सोनवणे यांनी भाषणात बोलताना मुख्यमंत्र्यांना रेल्वेची स्वप्नपूर्ती झाली आता पाणी देऊन दुष्काळमुक्त करा असे म्हटले.

## मराठा आरक्षणाच्या 'जीआर' विरोधातील याचिका हायकोर्टाने फेटाळली



### मनोज जरांगेंची पहिली प्रतिक्रिया समोर

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१८, जालना :** मनोज जरांगे पाटील यांनी एल्गार पुकारल्यानंतर त्यांच्या मागणीप्रमाणे सरकारने मराठा आरक्षणासाठी हैदराबाद गॅझेट लागू केले. मात्र सरकारच्या या निर्णयामुळे ओबीसी समाजात अस्वस्थता पसरली. त्यामुळे ओबीसी नेत्यांनीही आक्रमक पवित्रा घेत सरकारला धारेवर धरले आहे. ओबीसींनी कोर्टातही धाव घेत सरकारच्या जीआरविरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. मात्र ही याचिका आता उच्च न्यायालयाने फेटाळली आहे. त्यामुळे मराठा आरक्षणातील मुख्य अडथळा दूर झाला आहे, यामुळे मराठ्यांनी कुणबी प्रमाणपत्र मिळू शकणार आहे. यावर आत मनोज जरांगे पाटील यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. हैदराबाद गॅझेट विरोधातील जनहित याचिका न्यायालयाने फेटाळून लावल्यानंतर मराठा आरक्षण चळवळीचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी पहिली प्रतिक्रिया दिली आहे. 'आमचा न्यायदेवतेवर पूर्ण विश्वास आहे. गोरगरिबांच्या हक्कांसाठी न्यायदेवता नेहमी उभी राहते. सरकारनंतर न्यायदेवता हा गोरगरिबांचा खरा आधार आहे. त्यामुळे सरकारला आपली बाजू ताकदीने मांडावी लागणारच आहे,' असे जरांगे पाटील यांनी ठामपणे सांगितले.

दरम्यान मनोज जरांगे पाटलांनी पुन्हा एकदा छगन भुजबळ यांच्या खोचक टीका केली. 'भुजबळ म्हणजे अलिबाबा, येवल्याचा अलिबाबा दोन आरक्षण खात आहे. ओबीसींच्या काही जाती एससी आणि एसटीमधील आरक्षण खात आहेत. त्यांच्या शिक्षण नोकरीतील जागा हडपल्यात. मराठा आरक्षण टप्प्या टप्प्याने सुरुय आणि ओबीसींनी आतापर्यंत बोगस आरक्षण खाल्लंय. लवकरच भुजबळांना बेसन-भाकरी खावी लागेल,' अशा शब्दांत जरांगे यांनी टीका केली. पुढे जरांगेंनी असेही नमूद केले की, 'मी समाजातील गोरगरिबांसाठी सातत्याने काम करत आहे. समाजाचा माझ्यावर विश्वास आहे.

काही अभ्यासकांनी आजवर सम ाजासाठी ठोस योगदान दिलेले नाही. उलट गैरसमज पसरवले जात आहेत. पण जनतेने त्याकडे लक्ष देऊ नये.' दरम्यान, हैदराबाद गॅझेटवरील याचिका फेटाळल्यानंतर छगन भुजबळ यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे. 'आम्ही सुरुवातीपासूनच सांगत होतो की, जनहित याचिका न करता रिट याचिका दाखल करा. आतापर्यंत आम्ही चार-पाच रिट याचिका दाखल केल्या आहेत,' असे भुजबळ यांनी स्पष्ट केले.

या घडामोडींमुळे मराठा आरक्षण प्रश्नावरचा संघर्ष अधिक तीव्र होताना दिसत आहे. जरांगे पाटील यांनी केलेल्या वक्तव्यामुळे राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापण्याची चिन्हे आहेत. तर भुजबळांनी न्यायालयीन प्रक्रियेत सरकारच्या भूमिकेवर भर देत स्वतःचे मत मांडले आहे.

## शेतक-यांवर दुहेरी संकट !
### बाजारभाव नाही, त्यात साठवलेला कांदाही सडला! शेतक-यांचा आक्रोश

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१८, अहिल्यानगर :** कांद्याला अपेक्षित बाजारभाव मिळत नसल्याने अहिल्यानगर जिल्ह्यातल्या पारनेर तालुक्यातील शेतकरी मोठ्या अडचणीत आले आहेत. उत्पादन खर्चदेखील परत न मिळाल्याने शेतकर्यांच्या डोळ्यांत अश्रू तर आरणीत खराब होत असलेला कांदा पाहून हवालदिलपणा दिसून येत आहे. 'इकडे आड तर तिकडे विहीर' अशी कांदा उत्पादक शेतकर्यांची स्थिती झाली आहे.



दरवर्षीप्रमाणे यंदाही पारनेर तालुक्यात मोठ्या प्रमाणावर कांदा लागवड झाली. यामध्ये काही नवीन शेतकर्यांनीही चांगले उत्पन्न घेतले. मात्र एप्रिलमधील प्रखर उष्णता आणि मे म हिन्यातील अवकाळी पावसामुळे कांदा साठवणुकीत गंभीर अडचणी निर्माण झाल्या. पावसामुळे वाळवणात ठेवलेला कांदा सुरक्षित ठेवण्यासाठी शेतकर्यांनी कांदा चाळीत साठवणूक केली. पण, हवामानातील बदलामुळे आर्द्रता निर्माण होऊन कांदा सडण्यास सुरुवात झाली.

अनेक शेतकर्यांनी या वर्षी लाखो रुपये खर्च करून नव्या कांदा चाळी उभारल्या, परंतु त्या कांदा चाळीतच कांदा खराब होत असल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. एकीकडे गडगडलेले बाजारभाव, तर दुसरीकडे सडणारा कांदा-अशा दुहेरी संकटामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे.

**नवीन कांदा चाळीचा खर्च कधी निघणार ?**

कांदा खराब होत असल्याने शेतकरी लाखो रुपये खर्चून उभारलेल्या नवीन कांदा चाळीकडे आरणीकडे हताशपणे पाहात आहेत. कांद्याला भाव नाही, उत्पादन खर्च निघत नाही, मग या आरणीचा खर्च कधी निघणार, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा राहिला आहे.

शेतकरी सांगतात, तळहातावरील फोडाप्रमाणे जपलेले कांद्याचे पीक आमच्या डोळ्यांसमोर सडत आहे आणि बाजारात त्याला भावही मिळत नाही. उत्पादन खर्चदेखील निघत नसल्याने परिस्थिती बिकट झाली आहे.

## टिळक नगर पोलीसांची धडक कारवाई !
### घरफोडी व दोन वाहनचोरी प्रकरणे उघडकीस

**अक्षराज : विश्वनाथ शेनॉय**

**दि.१८, ठाणे :** टिळक नगर पोलीस ठाण्याच्या बीट मार्शल पथकाने धाडसी कारवाई करत दोन सराईत गुन्हेगारांना पकडून घरफोडी व दोन वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणले आहेत.

दिनांक १७ सप्टेंबर रोजी रात्री गस्त घालत असताना पोलीस हवालदार टिकेकर व पो.ह. मारनर यांना रात्री तीनच्या दरम्यान एमडीटीवर दोन इसम चोरीच्या तयारीत असल्याची माहिती मिळाली. जीवाची पर्वा न करता दोन्ही अंमलदारांनी तत्काळ आरोपींना धरून ठेवले असून त्यांच्या मदतीला सहाय्यक पोलीस निरीक्षक गणगे, आणि विसपुते सोबत, पो.ह. कानडे, (गुन्हे),पो शि उमेश राठोड व चालक पो शि लगस हे पोचले.

ताब्यात घेतलेले आरोपींकडून एक ॲक्टीव्हा दुचाकी आणि महिंद्रा पिकअप जप्त करण्यात आले. महिंद्रा पिकअपम ध्ये टिळक नगर पोलीस ठाणे हद्दीतील घरफोडी करून चोरलेले पीओपी साहित्य आढळले. त्यानुसार आरोपींवर



गुन्हा दाखल करण्यात आला असून टिळक नगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयकुमार कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास पोलीस निरीक्षक दत्तात्रय गुंड यांचा नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक रमेश चौगुले आणि भूषण पवार (पो. ह) करत आहेत.

**अटक आरोपींची नावे पुढीलप्रमाणे –**

मोहम्मद समी सफी अहमद खान (२५), राहणार – न्यू टेलीफोन एक्सचेंज, राहुल नगर, मधुबन चौक सहावी गल्ली, उल्हासनगर ३

आश्रफ मोहम्मद अख्तर खान (२७), राहणार – फैजान रजा मशीद समोर, इंदिरानगर, बैंगनवाडी रोड, गोवंडी, मुंबई

अभिलेख तपासात या दोघांवर पूर्वीपासून गुन्हे नोंद असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यांना न्यायालयात हजर केले असता पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

आरोपींच्या चौकशीत त्यांनी कोळशेवाडी पोलीस ठाणे हद्दीतून ॲक्टीव्हा दुचाकी आणि उल्हासनगर मध्यवर्ती पोलीस ठाणे हद्दीतून महिंद्रा पिकअप चोरी केल्याचे कबूल केले आहे.

**उघडकीस आलेले गुन्हे –**

टिळक नगर पोलीस ठाणे, गु.र. क्र. ६७०/२५
कलम ३३१(४), ३०५(अ), ३(५), ३२४(४) BNS
कोळशेवाडी पोलीस ठाणे, गु.र. क्र. ६८५/२५
कलम ३०३(२) BNS
मध्यवर्ती पोलीस ठाणे, गु.र. क्र. ७०४/२५
कलम ३०३(२) BNS, टिळक नगर पोलीसांनी केलेल्या या धडक कारवाईमुळे परिसरातील घरफोडी आणि वाहनचोरी गुन्ह्यांचे रहस्य उकलले असून पुढील तपास सुरू आहे.

# संपादकीय



## निर्मळ हवा गेली कुठं?

**नगरेची रचावी। जलाशये निर्मावी।**
**महा वने लावावी।। नाना विधे।।**

संत ज्ञानेश्वरांनी या अभंगातून त्या काळात पर्यावरणाचे महत्त्व अधोरेखित केले. समाजाचा शाश्वत विकास करताना पर्यावरणाचा समतोल राखला न गेल्यास मानवी जीवन आणि संस्कृतीची हानी होईल, याचे चित्रण अनेक संत व श्रेष्ठांनी केले आहे. ज्या काळात अशा वाययाची निर्मिती झाली, तेव्हा प्रदूषणाचा प्रश्न असण्याची शक्यता अल्पच. तरी मनुष्यासाठी पर्यावरण व शुद्ध वातावरणाचे महत्त्व संतांनी विशद करून ठेवले, यातून त्यांची दूरदृष्टी दिसते. या संतवचनांचा आठव होण्याचे कारण म्हणजे गेल्या आठवड्यात प्रसिद्ध झालेले केंद्राच्या पर्यावरण विभागाचे स्वच्छ वायू सर्वेक्षण. देशातील १३१ शहरांतील हवेची पाहणी करण्यात आली. स्वच्छ इंदूरने देशात पहिला क्रमांक पटकावला. छोट्या शहरांच्या वर्गवारीत अमरावती शहराने प्रथम मानांकन मिळवले, इतकीच काय ती महाराष्ट्रासाठी समाधानाची बाब. नाही म्हणायला पुण्यासह राज्यातील एक-दोन शहरांच्या कामगिरीत सुधारणा झाली. मात्र, अनेक शहरांच्या मानांकनात घसरण, ही चिंता आणि शरमेचीच गोष्ट!

स्वच्छ, सुंदर आणि प्रदूषणरहित शहराची फुशारकी माराणाऱ्या नाशिककरांचे मात्र या अहवालाने डोळेच उघडले. दहा लाखांहून अधिक लोकवस्तीच्या शहरांच्या वर्गात नाशिक सोळावे ठरले. गेल्या खेपेच्या तुलनेत ते केवळ तीन पायऱ्या वर चढू शकले. स्थानिक व्यवस्था त्यासाठी स्वत:ची पाठ थोपटून घेत असल्या, तरी प्रत्यक्षात कामगिरीत विशेष सुधारणा झालेली नाही. नवी मुंबई, ठाणे, पुणे आणि जळगाव ही शहरे या मानांकनात नाशिकच्या वर असल्याने सारेच अवाक् झाले. इथली स्वच्छ, निर्मळ हवा नेमकी गेली कुठे, असा प्रश्न मूळ नाशिककर आणि हवापालटासाठी या 'हेल्थ हब'कडे वळणाऱ्यांना न पडावा तरच नवल!

दंडकारण्याचा भाग असल्याने आणि साक्षात दक्षिण गंगा म्हटल्या जाणाऱ्या गोदावरीच्या काठावर वसलेला असल्याने निरोगी व स्वच्छ हवामानासाठी नाशिक परिसर पुरातन काळापासून ओळखला जातो. उत्तम हवामानाची दैवी देणगीच लाभल्याने सातवाहन, यादवांपासून अनेक राजवटी येथे होऊन गेल्या. त्या-त्या काळात त्यांची राजधानी म्हणूनही परिसर मान्यता पावला. मंत्रभूमी ते यंत्रभूमीच्या प्रवासातही आल्हाददायी वातावरण ही जमेची बाजू राहिली. ब्रिटिश काळात तर 'हिल स्टेशन' अशी या क्षेत्राची ओळख होती. सह्याद्रीचा घाटमाथा चढून नाशिकच्या दिशेने येताना वाटेत जाणवणारी हवेची झुळूक सुखद, गारेगार हवामानाची प्रचीती देणारी असते. याच गुलाबी हवेने शहरवासीय आणि शहराचीही तंदुरुस्ती जपली. त्यामुळे पर्यटकांचा ओघ वाढता राहिल्याने गेल्या काही वर्षांत 'मिनी महाबळेश्वर' हीसुद्धा या भागाची ओळख बनली. जिल्ह्याला आजवर जे काही मिळाले किंवा पुढे जे मिळणार आहे, ते केवळ याच नैसर्गिक देणगीच्या भरवशावर! मागील दोन-तीन दशकांत गाव ते शहर या प्रवासातही गावपण व सुखद हवामानाचा पिंड जपला गेला. अलीकडे मात्र महानगराच्या दिशेने निघालेल्या नाशिकची हवा कुंद बनली. कारखानदारी आणि वाहनांच्या वाढत्या कार्बन उत्सर्जनामुळे तर ती अक्षरश: काळवंडलीच.

जशी हवा खराब होण्याची कारणे माहीत आहेत, तशा उपाययोजनाही साऱ्यांनाच ठाऊक आहेत; परंतु हवासुद्धा ओरबाडण्याचे पातक घडते आहे. दगडी वास्तू वा देवदेवळांच्या संवर्धनासह आल्हाददायी हवामानाचा प्राचीन वारसा जपला जाणे महत्त्वाचे. आगामी सिंहस्थाचा जागतिक इव्हेंट करण्यासाठी हजारो-कोटी रुपये पायाभूत सुविधांसाठी ओतले जात आहेत. अशात 'हवापाण्या'ला विसरून चालणार नाही. त्याच्या सुदृढतेची तजवीज केली गेल्यास भाविकांसह सारेच आशीर्वाद देतील. अर्थात, या मोहिमेत नागरिकांसह प्रत्येक घटकाची उत्स्फूर्तताही आवश्यक. तसे घडले तरच गावपण जपणाऱ्या शहरांची 'स्वच्छ', 'निर्मळ' ओळख जपली जाऊ शकेल!

# शिवसंघर्षाची साक्ष देणारं चौथीतील इतिहासाचं पुस्तक

जि.प.मराठी प्राथमिक शाळेतील वर्ग चौथीतील अतिशय आवडणारा विषय म्हणजे शिवछत्रपतींचा इतिहास.महाराष्ट्राचेच नव्हेतर सकल हिंदुस्थानाचे दैवत छत्रपती शिवाजी राजे यांच्या जीवन वृत्तांत विषयी महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक मंडळांनी अभ्यासक्रमाचा विषय म्हणून मागील पंचेचाळीस वर्षापासून समाविष्ट केला आहे. परकीय आक्रमणापासून अखंड हिंदुस्थानातील छोटी-छोटी संस्थाने हव्याशा पोटी अमिषाला बळी पडून त्यांनी परकीयांना येथे वास्तव्य दिले.परकीयांनी त्यांच्या धर्मांध वृत्तीमुळे हिंदू धर्मावर अत्याचार करावयास सुरुवात केली.हिंदुस्थानाला परकीयांचे ग्रहण जवळपास दहाव्या ते अकराव्या शतकात लागले व हळूहळू त्यांनी समस्त हिंदुस्थान खिळ खिळ करून सोडला.तब्बल पाच ते सहा शतक हिंदुस्थानात या काळात हिंदूंना जागृत करण्यासाठी संतांची भूमिका महत्त्वाची ठरली.

महाराष्ट्राबरोबर इतर राज्यांमधील संतांनी हिंदू जागृतीचे कार्य केले. वेळप्रसंगी बलिदानही दिले.मात्र सकल हिंदूसाठी एक छत्री अंमल असणारा राजा नव्हता. सर्व संस्थाने विखुरलेली होती. राज्य-राज्यांच्या सीमारेषा ठरलेल्या नव्हत्या.जो तो आप-आपला खंड,भूप्रदेश वाचवण्याचा प्रयत्न करायचा.मात्र इतर हिंदूंवर अन्याय अत्याचार होतो आहे का? आया-बहिणींवर अत्याचार होतो आहे का? शेतकरी शेतसारा अतिरिक्त कर याने ग्रासला आहे का? व्यापार -उद्योगधंद्यावर अतिरिक्त कर लादले गेले आहे का? त्याचबरोबर गोरगरीब जनता हवालदिल झाली का?अशा या धार्मिक अस्तित्व कोणाच्या लक्षातच आले नाही. सर्व समाज, जनता, संस्थानेट जणू मेलेल्या मढ्यागत निपचित पडलेली होती. याच मढ्यामध्ये नव-संजीवनी ओतण्यासाठी माँ जिजाऊच्या पोटी जन्माला आला एक सूर्य तो म्हणजे छत्रपती शिवाजी राजा.याच शिवछत्रपतींचा इतिहास आमच्या बालवयात आम्हाला आमच्या जिल्हा परिषद मराठी शाळेत इयत्ता चौथीतील परिसर अभ्यासातंर्गत येणाऱ्या चौथीच्या इतिहास या पुस्तकातून शिकायला मिळाला.आतापर्यंतच्या इतिहासाच्या पुस्तकातील सर्वात आवडीचं आणि प्रिय पुस्तक म्हणजे शिवछत्रपती. या पुस्तकाचं मुखपृष्ठ एवढं छान आहे की, हातात घेतलं की,एक वेगळी शक्ती निर्माण व्हायची.इतर पुस्तके तर विद्येचे रूप होतीच मात्र, हे पुस्तक म्हणजे दिव्यतेचं प्रतिक होतं. हातात घेतल्यावर दर्शन घेण्यासाठी कपाळापर्यंत नेल्याशिवाय कधी पान उकललंच नाही.या पुस्तकाच्या अनुक्रमणिकेतील प्रथम धडा म्हणजे,शिवजन्मापूर्वीचा महाराष्ट्र.छत्रपती शिवरायांच्या जन्मा अगोदर सर्वत्र संस्थाने,राजेशाही यांचा अंमल होता.संस्थानीक,राजे जनतेच्या हितापेक्षा चैन विलासात मग्न होते आणि याच संधीचा फायदा घेऊन मुघल उत्तरेकडून भारतात आले. त्यांनी जनतेवर जुलूम केला.त्याला विरोध म्हणून संतांनी महत्त्वाची भूमिका बजावली.धर्मजागृतीचे कार्य केले.याविषयी संतांची कामगिरी या पाठात माहिती उल्लेखित आहे.सर्वप्रथम चक्रधर स्वामी यांनी महानुभव पंथांची स्थापना करून मानवतेचा संदेश दिला. संत नामदेव यांनी विठ्ठल भक्तीमार्गातून समाज प्रबोधन केले. बाराव्या शतकात संत ज्ञानेश्वरांनी धार्मिक रुढी परंपरेवर कराडून विरोध केला.गीतेवर भाष्य करून ज्ञानेश्वरीची निर्मिती केली व जगाच्या कल्याणासाठी परमेश्वरा जवळ दान मागितले. संत ज्ञानेश्वर महाराजांची विठ्ठल भक्तीची परंपरा कायम ठेवून संत एकनाथांनी अभंग,ओव्या,भारुडे या माध्यमातून समाज प्रबोधन केले. जातीभेदाला कडाडून विरोध केला. त्यानंतर छत्रपती शिवरायांचा काळात जगद्गुरु संत तुकाराम यांनी शक्ती बरोबर भक्तीचे महत्त्व सांगून शिवरायांच्या राज्यकारभारामध्ये तरुणांना मावळे म्हणून स्वराज्यासाठी लढण्याचे बळ दिले व संत रामदासांनी मनाचे-श्लोक, दासबोध यातून मनुष्याने कसे वागावे याची जाणीव करून दिली.

शिवछत्रपती या पुस्तकातील तिसरा पाठ म्हणजे मराठा सरदार व कर्तबगार भोसले घराणे गुरुजींनी छान हसत-खेळत पद्धतीने शिकवून इतिहासाची जाणीव करून दिली. छत्रपती शिवरायांचे भोसले घराणे.त्यांच्या घराण्यातील कर्तबगार व्यक्ती म्हणून वेरूळचे भोसले घराणे त्यापैकी विशेषत: शहाजीराजे भोसले यांच्या विषयी माहिती व घृष्णेश्वर मंदिर याविषयी माहिती दिसून येते. गुरुजींनी छान -छान गोष्टीच्या रूपाने समजावून सांगितले व इतिहासाची गोडी लावली.छत्रपती शिवरायांचे बालपण हा चौथा धडा.यामध्ये छत्रपती शिवरायांचा १९ फेब्रुवारी १६३० रोजी शिवनेरीवर झालेला जन्म,त्यांच्या बालपणीतील आठवणी व माँ जिजाऊंनी बाल शिवरायांना महाभारत, रामायण यातीलगोष्टी सांगितल्या.त्या शौर्य कथा शिवरायांना राजकारभारा मध्ये उपयोगी आलेल्या आपणांस दिसून येतात.शिवरायांचे सवंगड्यांसोबत सह्याद्रीच्या डोंगरदऱ्यातील खेळणे, बागडणे याचा उल्लेख आहे.त्यानंतर बाळराजे व मा जिजाऊ कर्नाटकात दाखल झाले. याविषयी वर्णन आहे. कर्नाटकात शहाजीराजेंच्या देखरेखीखाली शिवरायांना शिक्षण देण्यात आले. मात्र दोन अडीच वर्षातच कर्नाटकातून माँ जिजाऊ व शिवबा पुणे येथेआले. त्यांनी लालमहल येथे वास्तव्य केले. राजकीय शिक्षण घेतले. दादोजी कोंडदेव यांच्या मार्गदर्शनाने युद्ध प्रशिक्षण घेतले, त्यानंतर शिवरायांचा विवाह झाला व वयाच्या १५ व्या वर्षी शिवरायांनी रायरेश्वराच्या साक्षीने स्वराज्य स्थापनेची शपथ घेतली. मावळे जमवले. प्रथम तोरणा जिंकून स्वराज्याचे तोरण बांधले. गनिमीकावा युद्ध पद्धतीचा वापर करून स्वराज्याची घोडदौड सुरू केली. गुरुजींनी सांगितलेल्या शिवजन्मापूर्वीच्या महाराष्ट्रातील परिस्थिती व जनतेवर होणारे अन्याय अत्याचार त्यामुळे डोळे भरून यायचे. मात्र शिवरायांचा जन्मानंतर,स्थिती बदलली. त्यांनी स्वराज्याची स्थापना केली.जनतेला न्याय मिळवून दिला..तेव्हा मात्र खूप छान वाटले.. आनंद वाटला व पुढील इतिहास वाचनाची ओढ लागली. गुरुजींनी पुढील पाठ शिकवण्या अगोदरच शिवरायांचा इतिहास भरभर वाचून काढला एवढी गोडी व ओढ या पुस्तकाची लागली.

छत्रपती शिवरायांची कर्तबदारी वाचता-वाचता, या महान राजाच्या आयुष्यात एवढी संकटे असू शकतात याची जाणीव झाली.आठवा पाठ वाचताना ते लक्षातआले. शिवाजी राजे यांना परकींयाबरोबर स्वकींयासोबतही लढा द्यावा लागला. मेहुणा, सावत्र भाऊ, त्याचबरोबर जावळीचे मोरे सरदार यांचा बंदोबस्त करावा लागला. त्यांना स्वराज्याचे महत्त्व समजावून सांगावे लागले. त्याचबरोबर अफजल खानचा वध करून धर्मावरील व आया बहिणीवर संकट दूर केले. हे प्रतापगडावरील पराक्रम यात गुरुजींनी नव्या पाठातून शिकविले. छत्रपती शिवरायांचे सहकारी मित्र,मावळे, सरदार शिवाजीराजे साठी मरायला सुद्धा तयार व्हायचे त्यातील जिवंत उदाहरण म्हणजे बाजीप्रभू देशपांडे व शिवा काशीद यांच्या पराक्रमाची जाणीव शर्थीने खिंड लढवली यातून झाली. जीवनात सच्चे मित्र किती महत्त्वाचे याची ओळख पटली. त्याचबरोबर छत्रपती शिवरायांनी शाहिस्तेखानाची हाताची बोटे कापून कशी फजिती केली हे अकराव्या पाठात शिकलो.तेव्हा मात्र हसायला आले, कारण छत्रपतींनी शाहिस्तेखानाची चांगलीच फजिती केली होती व त्याची खोड मोडली होती.. या सर्व घटनेतून शिवरायांचे प्रस्थ वाढत होते. सर्व मुस्लिम राजवटीवर वचक बसला होता. मात्र कर्नाटकातून दु:खद बातमी आली की शहाजीराजे यांचे निधन झाले. तेव्हा मात्र छत्रपती शिवाजी राजे व मातोशी जिजाऊ माँ साहेब दुखी झाले.त्याच संधीचा फायदा घेऊन मिर्झा व दिलेरखानने पुरंदरला वेढा दिला. मोरारजी सारख्यांनी पराक्रम गाजविला मात्र युद्धात एक -एक सैन्य कामी येईल म्हणून त्यांनी मिर्झासोबत पुरंदरचा तह केला करण्याचे ठरवले. या तहात शिवरायांना खूप झळ सहन करावी लागली. लाखोंची खंडणी व तेवीस किल्ले मुघलांना द्यावे लागले.धूर्त मिर्झाने शिवरायांसोबत खेळी केली त्यांना आग्र्याला औरंगजेबाच्या भेटीला बोलावले. त्यांचा अपमान करण्याचा प्रयत्न केला. पण राजे जुमानले नाही म्हणून, त्यांना कपटी वृत्तीने आग्रा येथे नजर कैदीत ठेवले.मात्र शिवाजी राजे सीताफिने बादशहाच्या हातावर तुरी देऊन पेटार्यातून प्रसार झाले. वेशांतर करून मायभूमी कडे परतले.या पाठातून छत्रपती शिवाजीराजेच्या प्रति आदर वाढत गेला व शिवरायांच्या कर्तुत्वाची व शौर्याची जाणीव झाली.

तानाजी मालुसरे सारख्या निष्ठावंत सरदाराने जीव गमावून कोंढाणा जिंकून दिला व स्वराज्याची तहामुळे विस्कटलेली घरी नीट बसवली.हे गड आला पण सिंह गेला यातून शिकलो तेव्हा मात्र डोळ्यातून अश्रू टपकले. राजे छत्रपती झाले.हा अभूतपूर्व सोहळ्यातून ज्ञात झाले. वाचता-वाजता डोळ्यातून आनंदाश्रू खळखळ होऊ लागले. राजे स्वराज्याचे छत्रपती झाले. यातून शिवरायांच्या कर्तुत्वाची ओळख सर्व जगभर पसरली. छत्रपती शिवरायांनी स्वत:चे चलन, मुद्रा,मंत्रिमंडळ, राजकारणाची घडी बसवली. अष्टप्रधान मंडळाची स्थापना करून,संरक्षण व्यवस्था, मराठ्यांचे आरमार,किल्ले, हेरखाते, मुलकी व्यवस्था अश्या सर्व नियोजनबद्ध राजकारभाराची उभारणी केली. छत्रपती शिवराय यांनी दक्षिण दिग्विजय मोहीम गाजवली. जिंजी जिंकली. सावत्र भाऊ व्यंकोजीची समजूत काढली.मोहिमांवर-मोहिमा,दगदग यामुळे राजेंचे स्वास्थ बिघडू लागले.या दगदगीतून वयाच्या पन्नासव्या वर्षी त्यांनी जगाचा निरोप घेतला.या रयतेच्या राजाचा जीवन वृत्तांत पाठ्यपुस्तकात अगदी ओझरता होता. मात्र या एवढ्याश्या पाठय पुस्तकातून राजेंचा जीवनसंघर्ष लक्षात आला. शिवरायांची युद्धनीती, राज्यकारभार,जनतेवरील प्रेम आया -बहिणींचा सन्मान,स्वराज्य प्रेम अश्या अनेक घडामोडीतून इयत्ता चौथीच्या पाठ्यपुस्तकातून शिकवलेला शिवरायांचा जीवन वृत्तांत अजूनही कायम स्मरणात आहे.

मित्रांनो!राजे छत्रपतींच्या जीवनावर आधारित शिवछत्रपती हे परिसर अभ्यास अंतर्गत येणार इतिहासाचं हे पुस्तक सन १९७० पासून महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाने वर्ग चौथीच्या अभ्यासक्रमात समाविष्ट केले आहे.आज सन २०२५ पर्यंत जवळपास ४५ वर्षाचा कालखंड ओलंडला असून, लाखो विद्यार्थ्यांनी हे पुस्तक अभ्यासलं. छत्रपती शिवरायांना जाणून घेतलं.खरं सांगा मित्रांनो, वर्ग पहिलीपासून ते दहावीपर्यंत,बारावीपर्यंत शिक्षण घेतले कितीतरी पुस्तके शिकता-शिकता वाचली त्यांच मुखपृष्ठ व मलपृष्ठ स्मरणात आहे का?मात्र असा एकही जण नसेल कीं,चौथीतील शिवछत्रपती हे पुस्तक ज्याच्या स्मरणात नाही.मुखपृष्ठ मलपृष्ठतर नाहीतर,शिवरायांच्या संघर्षाची कहाणी सांगणारं हे पुस्तक प्रत्येकाच्या स्मरणातआहे.त्यातील एक-एक ओळी व एक -एक पान हे त्यांच्या जीवनातील संघर्ष,समर्पण याचीसाक्ष देतं.रयतेबद्दलचं प्रेम,स्वराज्याबद्दलची निष्ठा,महिलांचा मान- सन्मान,स्वच्छ कारभार,मित्र-प्रेम हे सर्व काही शिकवते. हे पुस्तक केवळ एक पुस्तक नव्हे तर, आजच्या पिढीतील विद्यार्थ्यांसाठी भूतकाळातील गोष्टींवरून भविष्याचा वेध घेण्यास शिकविणारं ज्ञानसेतू आहे.आजच्या पिढीतील विद्यार्थ्यांनी जीवनात यशस्वी होण्यासाठी कसा संघर्ष करावा करावा यासाठी उत्तम मार्गदर्शक आहे.



**- विनोद जाधव**
**मासरूळ जि.बुलडाणा**
**मो.९७६३२८२०७७**

# अमेरिकेतील गन संस्कृती !!

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे विश्वासू सहकारी आणि ट्रम्प यांच्यासाठी निधी गोळा करणारे अमेरिकेतील प्रतिष्ठित नागरिक असलेले चार्ली कर्क यांची अमेरिकेत नुकतीच गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. डोनाल्ड ट्रम्प यांच्या विश्वासू सहकाऱ्याची भर दिवसा रस्त्यांत गोळ्या झाडून हत्या करण्यात आल्याने जगभर खळबळ माजली. काहींनी याबाबत आश्चर्य व्यक्त केले मात्र अमेरिकेचा इतिहास पाहिला किंवा अगदी अलीकडच्या घटना पहिल्या तरी यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही कारण दिवसाढवळ्या गोळीबार करून हत्या करणे ही नवी गोष्ट नाही.

उलट अमेरिकेची ही संस्कृती आहे आणि ती अमेरिकेची गन संस्कृती म्हणून जगभर प्रसिद्ध आहे. आता चार्ली कर्क यांची हत्या झाल्याने आश्चर्य व्यक्त करणाऱ्यांनी मागे वळून पाहिले तर खुद्द डोनाल्ड ट्रम्प यांच्यावरही असा जीवघेणा हल्ला करण्यात आला होता ते ही एकदा नव्हे तर दोनदा हे माहीत नसावे. मागील वर्षी अमेरिकेत राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहचला असतानाच डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर दोनदा गोळीबार करण्यात आला होता. मागील वर्षीच्या सप्टेंबर महिन्यात ट्रम्प यांच्यावर दुसऱ्यांदा गोळीबार करण्यात आला होता विशेष म्हणजे त्या आधी दोन महिन्यापूर्वीच म्हणजे जुलै मध्येही त्यांच्यावर असाच गोळीबार करण्यात आला होता. दोन महिन्यात डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर दोनदा जीवघेणा हल्ला करण्यात आला होता. सुदैवाने दोन्ही वेळा त्यातून ते बचावले. मागील वर्षी १३ जुलै रोजी अमेरिकेतील पेनिसिल्व्हिया राज्यातील एका प्रचार सभेत त्यांच्यावर पहिल्यांदा गोळीबार करण्यात आला. त्यावेळी ट्रम्प यांच्यावर चालवण्यात आलेली गोळी त्यांच्या कानाला चाटून गेली होती. हा हल्ला सभेपासून जवळ असलेल्या छतावरून करण्यात आला. एका वीस वर्षीय तरुणाने त्यांच्यावर हल्ला केला होता. दुसरा हल्ला डोनाल्ड ट्रम्प हे वेस्ट पाम बीच येथील गोल्फ कोर्स वर गोल्फ खेळत असताना त्यांच्यावर करण्यात आला. झुडुपात लपून बसलेल्या रायन रूथ या तरुणाने त्याच्या ए के ४७ या रायफल मधून त्यांच्यावर गोळीबार केला. दैव बलवत्तर म्हणून दोन्हीवेळी त्यांचा जीव वाचला. डोनाल्ड ट्रम्प सारख्या मोठ्या जागतिक नेत्यावर जीवघेणा हल्ला झाल्यानंतर चार्ली कर्क यांच्यावर झालेला हल्ला हा किरकोळ वाटतो. डोनाल्ड ट्रम्प असो की चार्ली कर्क असो यांच्यावर झालेला गोळीबार हे अमेरिकेच्या गन संस्कृतीचे लक्षण आहे.

जगासाठी जरी अमेरिकेत होणाऱ्या गोळीबाराच्या घटना खळबळजनक असल्या तरी अमेरिकेसाठी हे काही नवे नाही. याआधीही अमेरिकेच्या काही माजी राष्ट्राध्यक्षांवर असे जीवघेणे हल्ले झाले आहेत. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन, जेम्स गारफील्ड, विल्यम मॅककिनले आणि जॉन एफ केनेडी याची हत्या झाली आहे. त्यांच्यावरही असाच गोळीबार करण्यात आला होता. केवळ राजकीय नेतेच नाही तर जनता देखील या गन संस्कृतीला कायम बळी पडत आली आहे. गन संस्कुतीमुळे अमेरिकेत लाखो नागरिक मरण पावले आहेत. अमेरिकेत गोळीबाराच्या घटनेत मरण पावलेल्या नागरिकांची संख्या ऐकली तर आपल्याला धस्स होईल कारण अमेरिकेत गोळीबाराच्या घटनांमध्ये मागील पन्नास वर्षात १४ लाख लोकांना जीव गमवावा लागला आहे. अमेरिकेत गोळीबाराच्या घटनेत दररोज सरासरी १०० लोक मरण पावतात. ही आकडेवारी थक्क करणारी आहे. कारण जागतिक महासत्ता असलेल्या देशात अशा प्रकारे लोकांचा जीव जात असेल तर ते धक्कादायकच नाही तर चिंताजनक देखील आहे. अमेरिकेत शाळेत गोळीबार झाल्याचा आणि त्यात अनेक शाळकरी मुलांचा मृत्यू झाल्याच्या बातम्या आपण नेहमीच ऐकतो, वाचतो अर्थात याला अमेरिकाच जबाबदार आहे. अमेरिकेत पूर्वीपासून गन संस्कृती अस्तित्वात आहे.

दुकानातून फळे, भाजीपाला मिळतात तशा तिथे बंदुका विकत मिळतात. बंदुका चालवण्यासाठी किंवा विकत घेण्यासाठी आपल्याकडे जसा शासकीय परवाना काढावा लागतो तसा तिथे काढावा लागत नाही. तिथे बंदुका आणि काडतूस सहज मिळतात म्हणूनच तिथे गन संस्कृती उदयास आली. आता हीच गन संस्कुती अमेरिकेच्या मुळाशी आली आहे. अमेरिकेच्या या गन संस्कृतीवर अनेकांनी चिंता देखील व्यक्त केली आहे पण अमेरिकेच्या नेत्यांनी ती कधीही गांभीर्याने घेतली नाही. खुद्द डोनाल्ड ट्रम्प हे गन संस्कृतीचे मोठे समर्थक आहेत. २०१६ मध्ये त्यांनी दिलेल्या एका मुलाखतीत त्यांनी रिव्हॉल्वर व रायफल हे स्वसंरक्षणासाठी एक उत्तम शस्त्र असल्याचे म्हंटले होते. केवळ ट्रम्पच नाही तर अमेरिकेतील अनेक नेते हे गन संस्कृतीचे समर्थक आहेत. आता मात्र हीच संस्कुती त्यांच्या जीवावर उठली आहे.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## ऋणी..

प्रकल्पाचे लोकार्पण
श्रेय घ्यायचे रे कुणी
ज्ञातअज्ञात सर्वांचेचं
बा राहू आम्ही ऋणी

श्रेय मंचावरी तिष्ठले
समस्त नेतोबा गुणी
आधी किती कुचेष्टा
काढतात उणी धुणी

डाग घासून घालवले
धुतली कुणी रे धुणी
पाहिले कठिण स्वप्न
दूर दृष्टी बुवा देखणी

सर्वकष प्रयासाअंति
केली विचारेआखणी
हातपुढे आले कुठले
येता अनंत अडचणी

सत्ताबदल होई जसा
प्रकल्प पडे वळचणी
लांबणीवर पडेसगळे
सतत येवून चढचणी

बिघडल्या गणितांची
मुश्किले करे जुळणी
चुका जरी पुन्हापुन्हा
निर्धारि करे उजळणी

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रस्त्यांमुळे अघई पिवळी विभागातील नागरिक हैराण




**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.१८, शहापूर (ठाणे) :** मुंबईची तहान भागवणारे तानसा व वैतरणा धरण शहापूर तालुक्यात असून मुंबईच्या दिशेने जाणारे रस्ते व मोरव्यांची अवस्था अतिशय खराब आहे. जणु काही येथील स्थानिक नागरिकांचा मृत्यूचा सापळाच बनला आहे. नुकताच वृत्तपत्रांमध्ये तानसा धरण पाण्याने पूर्ण भरल्यामुळे सर्वत्र आनंद व्यक्त केला जातो जेणेकरून मुंबईच्या नागरिकांचे जीवन सुरळीत चालावे, पण सतर्कतेचा इशारा येथील नागरिकांना दिला जातो. येथील स्थानिक शेतकऱ्यांनी आपला उदरनिर्वाह करणाऱ्या तसेच पोटाची खलगी भरणाऱ्या जमिनी येथील तलाव व जलवाहिनी पसरवण्यासाठी दिल्या आहेत. परंतु त्यांचे नशीबी खराब रस्ते व नवसाला पुजलेला दुष्काळच राहिला आहे. पुणेध्ये फाटा ते अघई दरम्यानच्या रस्त्यामुळे मुंबईच्या दिशेने नोकरी करणाऱ्या येथील तरुणांचा रस्त्याच्या व मोरव्याच्या दुरावस्था मुले मोठ्या प्रमाणात अपघात झाले आहेत आणि त्यांची कुटुंब ही उध्वस्त झाले आहेत. मुंबईकडे पाणीपुरवठा करणाऱ्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या खात्याकडून ह्या विभागातील नागरिकांसाठी कुठल्याही प्रकारचे सुसज्ज असं हॉस्पिटल केले नाही किंवा रस्ते व शैक्षणिक सुविधा नाही ही मोठी शोकांतिका येथील नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

## लासलगाव हत्याकांडानंतर आज लासलगाव बंद




**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१८, लासलगाव (नाशिक) :** नाशिक जिल्ह्यातील लासलगाव रेल्वे स्टेशन परिसरात एकतर्फी प्रेमाच्या वादातून घडलेल्या हल्ल्यात कुंदन नरेश पावरीय (वय २०) या तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला. अल्पवयीन मुलीच्या नातेवाईकांनी केलेल्या कोयत्याच्या हल्ल्यात तो गंभीर जखमी झाला होता. उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र मध्यरात्रीच्या सुमारास त्याचा मृत्यू झाला.

या घटनेनंतर मनमाड लोहमार्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून ५ आरोपींविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. त्यापैकी तिघांना अटक झाली असून उर्वरित आरोपींचा पोलिसांकडून शोध सुरू आहे. छत्रपती संभाजीनगर लोहमार्ग विभागाच्या पोलीस अधीक्षक स्वाती भोर यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. दरम्यान, मयत तरुणाच्या मृत्यूने परिसरात तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. मित्रपरिवार व नातेवाईक आक्रमक झाले असून या घटनेच्या निषेधार्थ शुक्रवार, दिनांक १९ सप्टेंबर रोजी लासलगाव बंदची हाक देण्यात आली आहे. या संदर्भातील निवेदन नाशिक ग्रामीणचे उपविभागीय पोलीस अधिकारी आदित्य मिरखेलकर यांना सादर करण्यात आले. निवेदनात उर्वरित आरोपींना तातडीने अटक न झाल्यास रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## चिमुकल्यांच्या प्रामाणिकपणा पोलिसांकडून शाबासकी



**अक्षराज : अमोल चव्हाण**

**दि.१७, कुर्ला (मुंबई) :** कुर्ला पश्चिम येथील महिला मंडळ संचालित माध्यमिक विद्यालय मधील इयत्ता ५ वी मध्ये शिकत असणारे विद्यार्थी संचित सचिन म्हापुसकर, चैतन्य संदीप मोरे, विघ्नेश विशाल मुळीक यांना एका कुर्ला स्टेशन नजीक अनोळखी वृद्ध महिलेचे पाकीट सापडले होते. त्या पाकीटमध्ये जवळ पास पावणे २ टोळ्यांची सोन्याची चैन आणि रोख रक्कम होती ते पाकीट त्या मुलानी लगेच कुर्ला पोलिस चौकीत जाऊन पोलिसांच्या ताब्यात दिली. कुर्ला पोलिस चौकीचे वरिष्ठ पोलिस अधिकारी म्हामुनकर यांनी लगेच त्या त्या मुलांच्या पालकांना बोलावून त्या मुलांचा आणि त्यांच्या पालकांचा सन्मान केला आणि सापडलेले वस्तू (सामान) त्या आजी-आजोबांच्या स्वाधीन केले. तसेच संपूर्ण कुर्ला वासियांकडून शुभेच्याचा वर्षाव करण्यात आला.

## वक्तृत्व स्पर्धांसाठी अडीच लाख रुपये देणगी



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१८, भिवंडी (ठाणे) :** भिवंडी तालुक्यातील शिक्षक व एक नाट्य कलाकार सदानंद गणपत म्हात्रे यांच्या कन्या कु.संस्कृती सदानंद म्हात्रे व कु.अनन्या सदानंद म्हात्रे या दोघी बहिणींनी गेल्या काही वर्षांपासून वक्तृत्व स्पर्धेच्या माध्यमातून मिळवलेली आपली बक्षिसांची संपूर्ण रक्कम आणि वक्तृत्वाची गुरुकिल्ली या त्यांच्या पुस्तकाच्या विक्रीतून मिळालेली रक्कम असे एकूण २,५०,००० (अडीच लाख रुपये) पाईपलाईन विभागीय विद्या प्रसारक मंडळ टेमघर ता.भिवंडी या संस्थेच्या 'सुवर्ण महोत्सवी' वर्षानिमित्त संस्थेला देणगी स्वरूपात देण्याचे जाहीर केलेले आहे. सदर २ लाख ५० हजार रुपयांची रक्कम ही पाईपलाईन विभागीय विद्या प्रसारक मंडळ टेमघर, ता.भिवंडी या शैक्षणिक संस्थेच्या माध्यमातून दरवर्षी आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करून शालेय विद्यार्थ्यांमध्ये वक्तृत्व कौशल्य विकसित करण्यासाठी ही रक्कम देणगी स्वरूपात देत असल्याचे सदानंद म्हात्रे यांनी सांगितले.

# न्यायालयाचे प्रश्न धारदार; अधिकाऱ्यांना गोत्यात आणणार !



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१८, ठाणे :** अनधिकृत बांधकामांना पाठीशी घालणारे ठाणे महापालिकेतील अधिकारी - कर्मचारी मुंबई उच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या चौकशी अधिकाऱ्यांनी विचारलेल्या प्रश्नामुळे गोत्यात येण्याची शक्यता असून महापालिका वर्तुळात त्यामुळे खळबळ उडाली आहे.

मुंब्रा, दिवा आणि शीळ भागातील अनधिकृत बांधकामांबाबत मुंबई उच्च न्यायालयाने ठाण्याच्या मुख्य न्यायमूर्तींना चौकशी करण्यासाठी जिल्हा न्यायाधीश तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश जी.जी. भन्साली यांची चौकशी न्यायाधीश म्हणून नियुक्ती केली होती. न्यायमूर्ती भन्साली यांनी महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्यासह महापालिका अधिकारी, कर्मचारी आणि समाजसेवक यांची साक्ष घेतली होती. महापालिका आयुक्त श्री.राव यांनी साक्ष दिली असून न्यायमूर्ती भन्साली यांनी महापालिका आयुक्त श्री.राव यांना १९ प्रश्न विचारले आहेत. त्यामध्ये लकी कंपाउंडच्या जागेवर नवीन अनधिकृत इमारत उभी राहत आहे का? अनेक अनधिकृत इमारतींच्या विरोधात कारवाई होऊन सुद्धा पुन्हा त्या इमारती उभ्या राहिल्या आहेत का? महापालिका हद्दीतील अनधिकृत इमारतींच्या तक्रारीवरुन उपायुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यांची चौकशी सुरु आहे का? त्यांना पदोन्नती देण्यात आली आहे का? कळवा येथिल दोन अनधिकृत इमारतींच्या विरोधातील कारवाई थांबविण्याचे आदेश तत्कालीन आयुक्तांनी दिले होते का? सहाय्यक आयुक्त प्रणाली घुगे यांनी ५२ अनधिकृत इमारतींचा अहवाल दिला होता. त्यावेळी अतिक्रमण उपायुक्त कोण होते? त्या इमारतीच्या विरोधात कारवाई केली होती का? त्याची सद्याची स्थिती काय आहे? त्या इमारतीच्या विरोधात कारवाई केली नसेल तर त्याला जबाबदार कोण? असे प्रश्न न्यायालयाने उपस्थित केले आहेत. या प्रश्नांमुळे महापालिकेच्या माजी आयुक्तांसह आजी-माजी अतिक्रमण विभागाचे उपायुक्त, अतिक्रमण विभागातील कर्मचारी, तसेच राजकारणी गोत्यात येण्याची शक्यता असून हा संघटित गुन्हेगारीचा प्रकार असल्याचे जागरुक ठाणेकरांचे म्हणणे आहे. याबाबत महापालिका आयुक्त सौरभराव यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही तर महापालिकेतील अधिकारी बोलण्यास तयार नाहीत.

# ग्रामीण भागाचा विकास साधण्यासाठी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान - आमदार दाते

## खडकवाडी येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा शुभारंभ



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१८, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील खडकवाडी ग्राम पंचायतीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त व ग्रामविकास व पंचायत राज विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान या महत्वाकांक्षी योजनेचा शुभारंभ विशेष ग्रामसभेद्वारे करण्यात आला. या कार्यक्रमाला आमदार काशिनाथ दाते, गटविकास अधिकारी दयानंद पवार आणि सरपंच शोभा शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

आमदार दाते यांनी ग्रामस्थांना या योजनेच्या उद्देशांबाबत मार्गदर्शन केले. दिनांक १७ सप्टेंबर २०२५ पासून राज्यभर लागू झालेली ही योजना ग्रामपंचायतींना सक्षम करून गावांचा सर्वांगीण विकास साधण्यावर भर देते. यात पाणीपुरवठा, रस्ते, शौचालय, शिक्षण, आरोग्य आणि पर्यावरण संवर्धन यासारख्या क्षेत्रांचा समावेश आहे. लोकसहभागावर आधारित या योजनेत सरपंच आणि ग्रामस्थ एकत्रितपणे विकासकामांचे नियोजन आणि अंमलबजावणी करतात. यामुळे ग्रामीण भागात आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक प्रगती होण्यास चालना मिळेल.

राज्यस्तरीय कार्यशाळांद्वारे सरपंचांना प्रशिक्षण देऊन ही योजना यशस्वी करण्याचे उद्दिष्ट आहे. यामुळे 'सशक्त पंचायत, समृद्ध महाराष्ट्र' हे ध्येय साकार होईल, असे दाते यांनी सांगितले. यावेळी डॉ.किशोर उर्फ बाबासाहेब ढोकळे, उपसरपंच अर्चना गागरे, विकास रोकडे, अमोल रोकडे, किरण वाबळे, अरुण गागरे, योगेश शिंदे, डॉ.नितीन ढोकळे, बाळासाहेब शिंगोटे, अविनाश ढोकळे, साबाजी गागरे, भाऊसाहेब गागरे, सखाराम नवले, धनंजय ढोकळे, कैलास आग्रे, अमोल म्हस्के, वैभव चौधरी, जनार्धन बोबडे, तुषार शिंदे, आदित्य दळवी, देविदास साळुंके, अशोक गागरे, जयश्री वाबळे, अक्षदा गागरे, अलका शिंदे, शशिकला शिंदे, रुपाली कुटे, सुरेखा ईघे, कविता रोकडे, मिराबाई हुलावळे, ग्रामविकास अधिकारी पंदारे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विंग गावातून राज्यस्तरीय अभियान शुभारंभ




**अक्षराज : सुहास महांगरे**

**दि.१८, खंडाळा (सातारा) :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान खंडाळा तालुक्यातील विंग गावातून राज्यस्तरीय अभियान शुभारंभ सुरू करण्यात आला. त्या प्रसंगी खंडाळा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी वर्ग १ अनिल वाघमारे यांच्या नेतृत्वाखाली विंग गावा मध्ये विठ्ठल रखुमाई मंदिरामध्ये ग्रामसभा आयोजित करण्यात आली होती. त्या प्रसंगी गट विकास अधिकारी अनिल वाघमारे यांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियान बाबत माहिती सांगितली आणि गावाने स्पर्धेमध्ये भाग घेऊन गावाला महाराष्ट्रात नंबर एकच बक्षीस कशा पद्धतीने मिळेल. यासाठी आपण सगळे प्रयत्न करणे आवश्यक आहे असे सांगितले. तसेच सर्व शासकीय कर्मचाऱ्यांना शासकीय योजना सर्व ग्रामस्थांपर्यंत कशा पोहोचतील यासाठी काम करण्याच्या सूचना दिल्या. ग्रामपंचायत विंग येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राज्यस्तरीय अभियान शुभारंभ प्रसंगी ग्रामसभेला कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा जिल्हा परिषद सातारा गौरव चक्के, गटविकास अधिकारी अनिल वाघमारे, उप अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा संजय लाड, ग्रामपंचायत विंगचे सरपंच स्वप्निल तळेकर, उपसरपंच पूनम तळेकर, सर्व सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी, ज्येष्ठ नागरिक, महसूल अधिकारी, पशुवैद्यकीय अधिकारी, आरोग्य अधिकारी, कृषी अधिकारी, जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा विंग व तळेकर वस्ती येथील मुख्याध्यापक त्यांचे सहकारी शिक्षक रामेश्वर विद्यालय चे मुख्याध्यापक त्यांचे सर्व सहकारी शिक्षक महिला बचत गट, अंगणवाडी सेविका व सर्व ग्रामस्थ ग्रामपंचायत कर्मचारी हे सगळे उपस्थित होते.

## दि प्रसाद क्रेडिट सोसायटीवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करा - मनसे



**अक्षराज : दिलीप कांबळे**

**दि.१७, वाई (सातारा) :** दि प्रसाद को - ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी मुंबई शाखा पाचवड तालुका वाई या सोसायटीमधील ठेवीदारांच्या ठेवी परत मिळवण्यासाठी ठेवीदारांनी वेळोवेळी आग्रह मागणी करून ही त्यांच्या १५ कोटीच्या ठेवी अडकल्या असून त्या परत देण्यास संस्था टाळाटाळ करत असून सभासदांना दमबाजी व दादागिरी भाषा संस्था करत असून अशा उर्मट संस्थेच्या अध्यक्ष संचालक मंडळावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणीचे निवेदन सहाय्यक निबंधक वाई व उपविभागीय पोलीस अधिकारी वाई यांना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने देण्यात आले. प्रसाद क्रेडिट सोसायटीच्या पाचवड शाखेत ठेवीदारांच्या जवळपास पंधरा कोटीच्या ठेवींची मुदत संपली होती.ठेवीदार मोदक संपल्यानंतर शाखेमध्ये ठेव पावतीची रक्कम काढण्यासाठी गेले असता रकमा आज देतो उद्या देतो म्हणून टाळाटाळ केली जात आहे उलट दादागिरी ची भाषा वापरली गेली सदर सोसायटीचा आर्थिक व्यवहार सहकारी कायद्याला अनुसरून होत नसल्याचे निदर्शनात आले आहे.

त्यामुळे सोसायटीचे चेअरमन दीपक रामचंद्र सोनावणे, व्यवस्थापक रुपेश पवार व संचालक मंडळ यांची चौकशी करण्यात यावी. ठेवीदारांच्या ठेवी परत कराव्यात असे न झाल्यास त्यांच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करावा वेळ पडल्यास ठेवीदाराच्या न्याय हक्कासाठी मनसे येत्या काळात तीव्र स्वरूपाचे आंदोलन उभे करेल असा इशारा देण्यात आला. यावर वाई तालुका अध्यक्ष मयूर नळ, सार्थक कोंढाळकर, वैभव जाधव, हर्षद खरचुंदे, दीपक भंडगे, रुपेश चोरगे यांच्या सह्या आहेत.

## विसापुरातील पाणंद रस्ते मोजणीसाठी तहसीलदार शेतशिवारात

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१८, विसापूर (चंद्रपूर) :** बल्लारपूर तालुक्यातील विसापूर येथील शेतावर जाणाऱ्या पाणंद रस्ते समस्या बिकट झाली आहे. अलीकडेच शेतकऱ्यांनी ही समस्या आमदार सुधीर मुनगंटीवार, खा. प्रतिभा धानोरकर, जिल्हा व तालुका प्रशासनाकडे मांडली. या रस्त्यांचे सिमांकन करून मोजण्यासाठी बल्लारपूर येथील तहसीलदार रेणुका कोकाटे यांनी शेतशिवारात येत पाणंद रस्ते मोजणी प्रक्रिया सुरु केली. बल्लारपूर तालुक्यातील विसापूर गावाच्या हद्दीत ८ पाणंद रस्ते निर्धारित करण्यात आले आहे. आजघडीला सदर रस्ते शेतकऱ्यांसाठी शेतामध्ये पेरणी, आंतरमशागत, कापणी, मळणी आदी कामे करण्यासाठी अडचणीत आणून देणारे आहे. यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे. या अनुषंगाने तहसिलदार रेणुका कोकाटे ऑनफिल्ड शेतशिवारात आल्या. त्यांनी पाणंद रस्ते मोजणी करून रस्त्यांचे सिमांकन करण्याचे निर्देश भूमिअभिलेख कार्यालयाला दिले. यावेळी तहसिलदार रेणुका कोकाटे, भूमिअभिलेख उपअधीक्षक अनिल देशमुख, मंडळ अधिकारी किशोर नवले, महसूल अधिकारी दिपक वढुले, ग्राम महसूल अधिकारी आरती दुलत, विसापूरच्या सरपंच वर्षा कुळमेथे, उपसरपंच अनेकश्वर मेश्राम यांना व शेतकऱ्यांच्या समक्ष वसंत गिरडकर ते बाळा टोंगे व ग्रामपंचायत शेत ते नदी घाट आणि कौशल्या तडस ते दिनकर वडस्कर यांच्या शेतादरम्यान मोजणी करण्याच्या प्रक्रियेला प्रारंभ केला. गावातील सर्वच पाणंद रस्त्यांची मोजणी करून सिमांकन करून देण्याचे त्यांनी शेतकऱ्यांना आश्वासन दिले.

## काजली ग्रामपंचायतीत मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा शुभारंभ

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.१८, तलासरी (पालघर) :** तलासरी तालुक्यातील ग्रामदान मंडळ काजकी ग्राम पंचायतीत मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा शुभारंभ नुकताच करण्यात आला. या निमित्ताने ग्रामपंचायत कार्यालयात विशेष ग्रामसभा आयोजित करण्यात आली होती. या सभेला एकूण १८२ ग्रामस्थ उपस्थित होते. या अभियानाअंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर विविध प्रकल्पांची अंमलबजावणी करून ग्रामविकासाला गती देण्यात येणार आहे. मुख्यमंत्री यांच्या संपूर्ण कार्यक्रमात सामाविष्ट असलेले प्रकल्प या ग्रामसभेत दाखल करण्यात आले. विशेष म्हणजे हे अभियान दिनांक १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत राबविले जाणार आहे. अभियानाच्या माध्यमातून सशक्त पंचायत निर्मितीसाठी पुढील ७ महत्त्वाच्या घटकांवर भर देण्यात आला आहे. यामध्ये सुशासन युक्त पंचायत, गावपातळीवरील संस्था सक्षमीकरण, लोकसहभाग व श्रमदानाद्वारे लोकचळवळ उभारणी, जलसमृद्ध, स्वच्छ व हरित गाव, मनरेगा व अन्य शासकीय योजनांशी अभिसरण, सक्षम पंचायत (स्वनिधी व लोकनियोजन), उपजीविका विकास व सामाजिक न्याय या सर्व बाबींवर ग्रामसभेत सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच प्रस्ताव एकमताने मंजूर करण्यात आले. या सभेचे अध्यक्ष सरपंच शशंकर जलाराम वरठा यांनी ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. उपसरपंच शजरेश रडका कोदया, ग्रामपंचायत अधिकारी नमिता वरखेडे, ग्रामपंचायत सदस्य, शासकीय कर्मचारी, अंगणवाडी व आशा सेविका तसेच मोठ्या संख्येने महिला व पुरुष ग्रामस्थ उपस्थित होते. या अभियानामुळे काजकी ग्रामपंचायत हद्दीतील गावांमध्ये विकासाच्या विविध क्षेत्रांना चालना मिळून सर्वांगीण प्रगतीस हातभार लागणार आहे. असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

अक्षराज



# महाराष्ट्रात पुन्हा एकदा मंद्रूपचे नाव झाले पाहिजे : आ. सुभाष देशमुख

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१८, सोलापूर :** आमदार सुभाष देशमुख यावेळी म्हणाले की माझ्या मतदारसंघातील मंद्रूप हे मोठे गाव आहे. मंद्रूप गावाने यापूर्वी माजी वसुंधरा अभियानात राज्यात पहिला क्रमांक पटकावला. आता मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानातही मोठी संधी आहे. यासाठी मी राजकारण बाजूला ठेवून मंद्रूपच्या विकासासाठी कोणतीही मदत करायला तयार आहे, असे अभिवचन दिले.

सोलापूर माझी वसुंधरा अभियानात दक्षिण सोलापुरातील मंद्रूप गावाने महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावला. आता नव्याने सुरू झालेल्या मुख्यमंत्री पंचायतराज समृद्ध अभियानातही मंद्रूप ग्रामपंचायतीने हॅट्रिक साधली पाहिजे, अशी अपेक्षा आमदार सुभाष देशमुख यांनी व्यक्त केली. मंद्रूप गावाच्या विकासाचा पॅटर्न तयार होण्यासाठी राजकारण बाजूला ठेवून मी कोणतीही मदत करायला तयार आहे, असे अभिवचन देशमुख यांनी यावेळी दिले.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान शुभारंभप्रसंगी आयोजित ग्राम सभेला आमदार सुभाष देशमुख यांनी हजेरी लावली. जिल्हा परिषदेच्या पाणी व स्वच्छता विभागाचे जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव व सरपंच अनिता कोरे यांच्याहस्ते संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून सभेला सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी उपसरपंच भगवान व्हनमाने, जिल्हा परिषदेचे माजी कृषी सभापती आप्पाराव कोरे, अपर तहसीलदार सुजित नरहिरे,



मंडल अधिकारी ज्योतीराम पवार, तलाठी कोकरे, कृषी सहाय्यक रमेश फरताडे, ग्रामपंचायत सदस्य सुरेश टेळे शिवपुत्र जोडमटे शिवानंद लोभे सुरेश मेंडगुले अंकिता कुंभार, मुख्याध्यापक प्रकाश कुंभार, भाजपचे तालुकाध्यक्ष संगपा केरके आदी उपस्थित होते.आमदार सुभाष देशमुख यांनी माझी वसुंधरा अभियानामध्ये मंद्रूप ग्रामपंचायतने राज्यभर केल्याबद्दल सरपंच अनिता कोरे व ग्राम विकस अधिकारी नागेश जोडमोठे यांचे कौतुक केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून राज्यभर मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान ही मोठी योजना सुरू केली आहे.

या योजनेसाठी पुरस्कृत ठरणाऱ्या ग्रामपंचायतींना बक्षिसाच्या मोठ्या रकमा ठेवण्यात आले आहेत. असे बक्षीस मिळवणाऱ्या ग्रामपंचायतीच्या विकासाला मोठा हातभार लागणार आहे. माझी वसुंधरा योजनेप्रमाणेच मंद्रूप ग्रामपंचायतीने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात ही बाजी मारावी अशी अपेक्षा आमदार देशमुख यांनी व्यक्त केली. यासाठी मंद्रूप ग्रामस्थ व विशेष करून महिलांनी पुढाकार घ्यावा. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरूच राहणार असून यातून मिळणाऱ्या रकमेतून गावातील महिलांनी संस्था स्थापन करावी. या संस्थेच्या माध्यमातून उभारण्यात येणाऱ्या पैशाचा विनीयोग स्वतःच्या कुटुंबाचा विकास व त्याचबरोबरीने गावच्या विकासासाठी हातभार लावावा अशी अपेक्षा व्यक्त केली. मंद्रूप गावच्या विकासासाठी मी राजकारण बाजूला ठेवून मदत करण्यासाठी तयार आहे. मंद्रूप हे कृषीसमृद्ध गाव आहे. या गावातून सोलापूरकडे जाणाऱ्या निशिगंध फुलातून अत्तर तयार व्हावा. त्यासाठी तरुण शेतकऱ्यांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे असे सांगितले.

**ग्रामस्थांच्या हातात विकास...**

माझी वसुंधरा अभियानात मंद्रूप ग्रामपंचायतने राज्यभर नाव कमाविले. आता मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराजमध्येही मंद्रूपने बाजी मारायची असेल तर ग्रामस्थांचा सहभाग महत्त्वाचा आहे, असे प्रतिपादन स्वच्छ भारत मिशनचे जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव यांनी केले. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात कोणकोणत्या गोष्टीचा समावेश आहे याबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली. ग्रामविकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गोरे यांच्या संकल्पनेतून ही योजना आली आहे. त्यामुळे सोलापूर जिल्ह्याला काम करण्यास मोठी संधी आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना राबविण्याबरोबर गावातील घनकचरा, सांडपाणी, प्लास्टिक कचरा संकलन व विलगीकरण, स्वच्छ पाणीपुरवठा, रोजगार, कृषी योजना, स्मार्ट स्कूल, स्मार्ट अंगणवाडी, महसूलचा पुढाकार आदी बाबी महत्त्वाच्या असल्याचे त्यांनी सांगितले. महिलांनी बचत गटाच्या माध्यमातून परसबाग, शौचालय वापरावर भर द्यावा अशी अपेक्षा व्यक्त केली.

**गावरस्ते येणार नकाशावर...**

मंडल अधिकारी ज्योतीराम पवार यांनी महसूल विभागामार्फत सुरू असलेल्या योजनांची माहिती दिली. शेतकऱ्यांना रस्त्यांबाबत मोठ्या अडचणी येतात. गेल्या ७० वर्षात शेतीसाठी अनेक शिवार रस्ते आहेत. पण हे रस्ते नकाशावर नसल्याने अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे महसूल विभागाने शिवाररस्ते नकाशावर आणण्यासाठी मोहीम सुरू केली आहे. अशा रस्त्यांचे संकलन होत आहे. परंतु पावसाचा व्यत्यय आल्यामुळे काम थांबले आहे. महसूलच्या नजरेतून काही रस्ते सुटण्याची शक्यता असल्यामुळे शेतकऱ्यांनी आपल्या शिवार रस्त्याची माहिती तलाठ्याकडे द्यावी, अशी सूचना मांडली.

# पाटण तालुक्यात महसूलचा सेवा पंधरवडा सुरु...

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१७, पाटण :** महाराष्ट्र शासनाने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान राबविले आहे. त्याअंतर्गत पाटण तालुक्यात सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या निर्देशानुसार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिन १७ सप्टेंबर ते राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती २ ऑक्टोबर या कालावधीत सेवा पंधरवडा साजरा करण्यात येणार असल्याची माहिती तहसीलदार अनंत गुरव यांनी दिली.

यामध्ये एकसमान नावे असणाऱ्या खातेदार यांचे नावापुढे टोपण नाव किंवा आईचे नाव दाखल करणे आणि नकाशा अभिलेख नकाशा सहीत ७/१२ या दोन नावीन्यपूर्ण उपक्रमासहित ग्रामीण रस्ते, हद्दीचे ग्रामीण रस्ते, ग्रामीण गाडीमार्ग, पायमार्ग, शेतावर जाण्याचे पायमार्ग, गाडीमार्ग, पाणंद रस्ते यांना विशिष्ट संकेतांक देण्यात आला आहे. त्यानुसार तहसीलदार यांच्या मान्यतेने ग्राम महसूल अधिकारी हे त्या गावच्या या रस्त्यांचे सीमांकन करणे व त्यांना विशिष्ट क्रमांक देण्याबाबत कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे.

पहिल्या टप्प्यात प्रत्येक गावातील ग्रामसेवक आणि ग्राममहसूल यांच्या मदतीने शिवार पेटी तयार करून रस्त्यांची यादी तयार करणे अपेक्षित आहे. अतिक्रमित रस्त्यांची यादी ग्रामसभेपुढे मांडण्यात येणार आहे. ग्रामसभेच्या मान्यतेनंतर अंतिम यादी तहसीलदार कार्यालयात सादर केली जाईल. दुसऱ्या टप्प्यात यादीतील अतिक्रमित व नकाशावर नसलेल्या रस्त्यांचे उपअधीक्षक, भूमी अभिलेखांकडून मोजणी व सीमांकन करण्यात येईल. यासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. तिसऱ्या टप्प्यात प्रत्यक्ष पाहणी करून तहसीलदार कार्यालय अतिक्रमणधारकांना नोटीस बजावणार आहे. त्यानंतर मंडल अधिकारी कार्यालयात सुनावणी घेऊन, अतिक्रमण निष्कासित करण्याचे आदेश पारित करण्यात येतील. पोलीस यंत्रणेची मदतही आवश्यकतेनुसार घेण्यात येईल.

शेवटी रस्त्यांची नोंद अधिकृत गाव नकाशावर सार्वजनिक रस्ता म्हणून करण्यात येईल. तलाठी गाव दप्तरामध्ये नमुना नंबर १ (फ) मध्ये सर्व रस्त्यांची नोंद घेण्यात येणार आहे. हा उपक्रम ग्रामीण भागातील रस्ते व्यवस्थापन आणि सार्वजनिक मालमत्तेच्या संरक्षणासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे. यावेळी विस्तार अधिकारी, सर्व मंडळ अधिकारी व ग्राममहसूल अधिकारी यांची उपस्थिती होती.

**अतिक्रमण काढण्यासाठी समिती गठीत...**

अतिक्रमण काढण्याकरिता ग्रामपंचायत, महसूल यंत्रणा, भूमी अभिलेख विभाग, पोलीस विभाग आदी विभागांची समिती गठीत करण्यात आली आहे. प्रांताधिकारी अध्यक्ष असून गटविकास अधिकारी, उपअधीक्षक भूमी अभिलेख, पोलीस निरीक्षक, उपनिरीक्षक हे सदस्य तर तहसीलदार सदस्य सचिव आहेत.

# आश्रमशाळा शिक्षक - कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित समस्यांबाबत सहविचार सभा

## आ.सुधाकर अडबाले यांच्या पुढाकाराने अपर आयुक्त यांच्यासोबत बैठक

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१८, चंद्रपूर :** नागपूर येथील आदिवासी विकास विभागाच्या सभागृहात शासकीय व अनुदानित आश्रमशाळांतील शिक्षक व कर्मचारी यांच्या प्रलंबित समस्यांबाबत आ. सुधाकर अडबाले यांच्या पुढाकाराने सहविचार सभा पार पडली. या सभेत सामूहिक व वैयक्तिक समस्यांबाबत चर्चा करण्यात आली.

या प्रलंबित समस्या प्रकल्प अधिकारी व अपर आयुक्त स्तरावरील समस्या तात्काळ निकाली काढाव्या, अश्या सूचना आ. सुधाकर अडबाले यांनी दिल्या. सभेच्या प्रारंभी मागील बैठकींच्या इतिवृत्तावर चर्चा करून प्रलंबित प्रश्नांवर तातडीने निर्णय घेण्याचे आश्वासन मा. उपायुक्त यांनी दिले.



विद्यार्थी साहित्य, गणवेश, गादी, ब्लँकेट, शूज इत्यादींचा पुरवठा, वर्ग-४ कर्मचारी पदभरती, शिक्षक संवर्गातील रिक्त पदे, प्रतिनियुक्ती रद्द करणे, नक्षलग्रस्त भत्ता लागू करणे, जुनी पेन्शन योजना व भविष्य निर्वाह निधी खात्याबाबतचे आदेश, शाळांवरील सहाय्यक अधीक्षक पदे, दिवाळी सुट्टीचे वेळापत्रक, कर्मचाऱ्यांच्या गोपनीय अहवालाच्या प्रती, सुरक्षारक्षक नेमणूक, वेतनवाढ, कला-क्रीडा-संगणक शिक्षक नियुक्ती, प्रवास व कार्यालयीन खर्चासाठी निधी, अधीक्षक संवर्गाचे प्रशिक्षण, संवर्गीय पदोन्नती, अपंग कर्मचाऱ्यांची सेवा ज्येष्ठता, शिक्षकांच्या तासिका नियोजन, लिपिक भरती, कार्यमुक्ती, वेतन निश्चिती, शालेय सुट्या, स्वयंपाकी व ग्रंथपाल यांना दीर्घ रजा, विद्यार्थ्यांसाठी केअर टेकर नेमणूक, तसेच अर्जित रजा रोखीकरण यासारख्या तब्बल ३१ मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. याशिवाय शिक्षकांना ४३०० व ४८०० ग्रेड पे मंजूर करावे, दहा वर्षे सेवा पूर्ण केलेल्या रोजंदारी कर्मचाऱ्यांचा प्रश्न, भ.नि.नी. प्रस्ताव, अनुकंपा तत्वावर नोकरी, कार्यमुक्ती अशा तातडीच्या विषयांवरही ठोस भूमिका घेण्यात आली. बहुतेक सर्व मुद्द्यांवर सकारात्मक प्रतिसाद देत अप्पर आयुक्त व उपायुक्त यांनी आश्वासन दिले.

सभेत कर्मचाऱ्यांच्या मागण्यांना जोरकस पद्धतीने मांडताना मा. आमदार अडबाले यांनी शिक्षक-कर्मचारी यांचे प्रश्न सोडविण्यासाठी नेहमी लढा देऊ, पण त्याचबरोबर शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेकडे प्रामाणिक लक्ष द्यावे असे प्रतिपादन केले.

अपर आयुक्त आयुषी सिंह यांनीही शिक्षकांच्या प्रश्नांवर सहानुभूतीपूर्वक निर्णय होईल, असे आश्वासन दिले. या सहविचार सभेला अपर आयुक्त आरुषी सिंह, उपायुक्त दिगांबर चव्हाण, माजी आमदार व्ही. यू. डायगव्हाणे, सिटू संघटनेचे राज्य सरचिटणीस प्रा. बी. टी. भामरे, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे प्रांतीय उपाध्यक्ष रमेश काकडे, सिटू संघटनेचे नागपूर विभागीय अध्यक्ष आर. टी. खवशी, संस्कृती संघटनेचे विभागीय अध्यक्ष भोजराज फुंडे, अनुदानित/शासकीय आदिवासी आश्रमशाळा संघटना चंद्रपूरचे अध्यक्ष प्रमोद साळवे, सचिव मनोज आत्राम, कार्याध्यक्ष बजरंग जेनेकर, मार्गदर्शक चंद्रभान वरारकर, विकास जनबंधू, पवार, आर एम पत्रे, के बी लांजेवार, कु. सुरेखा तेलतुंबडे, देव बनसोड, विवेक विरुटकर, भोंगाडे व समस्याग्रस्त शिक्षक, कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

# थोडक्यात

## टाकळीढोकेश्वर ग्रामपंचायतीची ग्रामसभा संपन्न



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१८, पारनेर (अहिल्यानगर) :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज राज्यस्तरीय अभियानाचा शुभारंभ निमित्त दि.१७ सप्टेंबर २०२५ रोजी पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथिल ग्रामपंचायतीच्या वतीने विशेष ग्रामसभेचे आयोजन सरपंच अरुणा खिलारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या सभागृहात करण्यात आले होते. खेळीमेळीच्या वातावरणात ही ग्रामसभा संपन्न झाली. यावेळी सरपंच अरुणा खिलारी, उपसरपंच किरण तराळ, माजी सरपंच शिवाजी खिलारी, ग्राम पं.सदस्य दत्तात्रय निवडुंगे, ग्राम पंचायत सदस्या सुग्राबी हवलदार, अर्चना रांधवण, सुनिता झावरे, ग्राम महसूल अधिकारी वैभव उरमुडे, ग्रामविकास अधिकारी बाळासाहेब दावभट, लखन अल्हाट, शुभम कुटे उपस्थित होते.

यावेळी ग्रामसभेत राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे राज्यातील जनतेला होणार्या संबोधनाचे थेट प्रक्षेपण स्क्रीन द्वारे दाखविण्यात आले. दरम्यान ग्रामसभेत दिनांक १७ सप्टेंबर २०२५ पासून राज्यभर सुरू झालेली योजना प्रभावीपणे राबवून गावचा सर्वांगीण विकास करणे याविषयी माहिती दिली. महसूल पंधरवडा अंतर्गत शेत पांदण रस्ते, जन्म मृत्यू नोंद, शैक्षणिक, प्रधानमंत्री आवास योजनेतील मंजूर घरकुले वेळेत पूर्ण करणे, कचरा व्यवस्थापन, शिवार रस्त्यांचे सर्व्हेक्षण करणे, आदि विषयांवर उपस्थित केलेल्या प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक, अंगणवाडी कर्मचारी, महावितरणचे कर्मचारी, ग्रामस्थ, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विंचूर-किसनवाडी शिवारात बिबट्याची दहशत

### शेतकरी व शाळकरी मुलांमध्ये भीतीचे वातावरण

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१८, विंचूर (नाशिक) :** विंचूर - किसनवाडी शिवारात गेल्या पंधरा दिवसांपासून बिबट्याचा मुक्त संचार सुरू असून शेतकरी, रहिवाशी तसेच शाळेत जाणारी लहान मुले प्रचंड भयभीत झाली आहेत. मंगळवार, दि.१६ रोजी सायंकाळी सात वाजता लक्ष्मण मोरे व रामदास (बाबा) मोरे यांच्या वावरात गडी काम करत असताना पिवळसर-पांढऱ्या रंगाचा बिबट्या अचानक दिसला. यावेळी ज्ञानेश्वर पवार यांच्या कुटुंबीयांवर व मुलांवर त्याने झडप घालण्याचा प्रयत्न केला. मात्र, महिलांनी व लहान मुलांनी मोठ्याने आरडाओरडा केल्याने बिबट्या साईटने बाजूला पळून गेला.

ग्रामस्थांच्या मते या शिवारात रोजच बिबट्याच्या पायखुणा आढळतात. शाळेत जाणाऱ्या मुलांना शिवारातील अरुंद पाऊलवाटेने जावे लागते, तर चारी बाजूंनी उंच मक्याची व इतर पिकांची शेते असल्याने भीती आणखी वाढली आहे. सामाजिक कार्यकर्ते ओम राऊत यांच्या संपर्कानंतर वनविभागाने बुधवारी (दि.१७) एक पिंजरा शिवारात लावला आहे. मात्र येथे दोन बिबट्यांचा वावर असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे असून दोन पिंजरे लावावेत, अशी मागणी शासनाकडे करण्यात आली आहे. या भागातील ग्रामस्थांत रामदास (बाबा) मोरे, लक्ष्मण मोरे, नंदू मोरे, प्रकाश थोरात, भाऊसाहेब थोरात, चंद्रकांत थोरात, ज्ञानेश्वर पवार, रंजना पवार, दिपाली पवार, नंदू पवार, अलका पवार आदींचा समावेश आहे. ग्रामस्थांचे भीतीचे वातावरण कमी करण्यासाठी आणि मुलांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने वनविभागाने योग्य ती कार्यवाही करावी, अशी जोरदार मागणी केली आहे.

## कुंडलवाडी सोसायटीतर्फे धर्माबाद तहसीलदारांना पत्र




**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.१७, कुंडलवाडी (नांदेड) :** कुंडलवाडी सोसायटीच्या कार्यक्षेत्रात असलेल्या माष्टी, पाटोदा (थडी), शेळगाव (थडी) व चेन्नापूर या गावातील उपसा योजनेअंतर्गत असलेल्या शेतकऱ्यांच्या कर्जाचा बोजा काढण्यासाठी कुंडलवाडी येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी चे चेअरमन सुनील बेजगमवार यांच्या शिष्टमंडळाने धर्माबाद च्या तहसीलदार सुरेखा स्वामी यांची दि.१७ सप्टेंबर २०२५ रोजी भेट घेऊन उपसा जलसिंचन योजनेच्या कर्जाचा बोजा सातबारा वरून काढण्यासाठी सोसायटी तर्फे पत्र देण्यात आले. यावेळी व्हॉईस चेअरमन गंगाधर नरावाड, संचालक संजय गंगोणे, बालाजी पाटील जोगदंड आदी जण यावेळी उपस्थित होते. यावेळी तहसीलदार सुरेखा स्वामी यांनी लवकरच शेळगाव (थडी), माष्टी पाटोदा (थडी),चेन्नापूर गावातील उपसा जलसिंचन योजनेच्या अंतर्गत असलेल्या शेतकऱ्यांच्या सातबारा वरील कर्जाचा बोजा कमी तलाठी यांच्यामार्फत लवकरच कार्यवाही करु असे असे यावेळी सोसायटीच्या शिष्टमंडळाला दिले.

## मिरा भाईंदर मध्ये मुलांना गोवर आणि रुबेला लसीकरण मोहीम

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.१८, मिरा भाईंदर :** गोवर आणि रुबेला आजारांपासून विद्यार्थ्यांचे संरक्षण करण्यासाठी राज्य शासनाने विशेष लसीकरण मोहीम हाती घेतली आहे. दि.१५ सप्टेंबर ते दि.३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत मिरा भाईंदर शहरातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना गोवर व रुबेलाची लस दिली जाईल. गोवर (मिझल्स्) हा आजार पॅरामिक्सोव्हायरस विषाणूमुळे होतो., तर रुबेला (जर्मन गोवर) हा रुबी व्हायरस नावाच्या विषाणूमूळे मुलांना होतो. हे दोन्ही अत्यंत संसर्गजन्य विषाणूजन्य आजार आहेत. जे हवेतील थेंबा द्वारे एका व्यक्तीकडून दुस-या व्यक्तीमध्ये पसरतात; विशेषत: खोकताना किंवा शिंकताना, दोन्ही आजारांमध्ये ताप आणि अंगावर पुरळ येणे ही सामान्य लक्षणे आहेत. सदर लसीकरण मोहीम राबविण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत आरोग्य केंद्रांमार्फत विशेष पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर पथकांमध्ये वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, प्रसविका, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी आदींचा समावेश राहणार आहे. या आजाराच्या गुंतागुंतीत अंधत्व, मेंदूज्वर, अतिसार, कानाचे आणि श्वसन संस्थेमध्ये संक्रमण (न्युमोनिया) दिसून येतात. रुबेलामुळे गर्भवती स्त्रिया व नवजात बालकांमध्ये गंभीर परिणाम होऊ शकतात. या आजारावर विशिष्ट उपचार उपलब्ध नसले तरी च.ठ. (एम.आर.) लसीकरण हे सर्वात प्रभावी संरक्षण आहे. गोवर रुबेला लसीकरणाचे प्रमाण ९५ टक्के जास्त साध्य करणे, M.R. (एम.आर.) लसीच्या दोन डोस मधील ड्रॉप आऊटरेट शून्यापर्यंत आणणे. ही या मोहिमेची उद्दिष्ट आहेत. या मोहिमेचे यशस्वी होणे म्हणजे शहरातील प्रत्येक बालकाचे सुरक्षित भविष्य घडविणे होय. एकही बालक लसीकरणापासून वंचित राहणार नाही, याकरीता पालक, शिक्षक व ग्रामस्थांनी सहकार्य करून ही मोहीम यशस्वी करावी, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासन मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्यामार्फत करण्यात येत आहे.